भरत चंद्रकांत कालुवाला, माहिम, मुंबई.

□ जुन्या जमान्यातील चरित्र अभिनेते बद्रीप्रसाद यांनी एकूण किती चित्रपटांत भूमिका केल्या असतील? ते सध्या कोठे असतात?

— १९३८ला पडद्यावर आलेला भवनानी प्रॉडक्शनचा *हिमालय की बेटी* बद्रीप्रसाद यांची भूमिका असलेला पहिला चित्रपट. त्यानंतर शंभर ते दिडशे चित्रपटात त्यांनी लहानसहान भूमिका केल्या असतील. आज ते आपल्यात नाहीत. ९ मार्च १९८१ला त्यांचं निधन झालं. ते निव्वळ नट नव्हते तर संगीतकार देखील होते. *झिम्बो द एप मॅन, हिमालय की बेटी, झिम्बो का बेटा, झुठी शर्म, बनमाला* यासारख्या काही चित्रपटांना त्यांनी संगीत दिलं.

उमेश सुर्वे, तुळजापूर.

□ आमीरचा *जवानी जिंदाबाद, जो जिता वही सिकंदर*, सैफचा *यह है मुंबई मेरी जान*, सलमानचा *सूर्यवंशी*, नाना पाटेकरचा *वध* या चित्रपटाचे दिग्दर्शक कोण?

— अनुक्रमे अरुण भट्ट, मन्सूर खान, कुंदन शहा, राकेशकुमार, राजभारती.

मनोज निवास कामत, कोल्हापूर.

□ नसीरुद्दीनने खलनायकाची भूमिका साकारलेले चित्रपट कोणते? त्याला कोणकोणत्या चित्रपटांसाठी फिल्मफेअर पुरस्कार मिळालाय?

— *बेजुबान, कन्हैय्या, राजकुमार, मोहरा* या चित्रपटात नसीरुद्दीन खलनायक होता. *आक्रोश, चक्र, मासूम* या चित्रपटासाठी नसीरुद्दीनला फिल्मफेअर पुरस्कार मिळालाय.

गणेश कृष्णा कोळी, वरैंडी कोळीवाडा.

□ *धर्मपुत्र*चे संगीतकार कोण? या चित्रपटात पाहुणा कलाकार कोण होता?

— *धर्मपुत्र*चे संगीतकार होते एन. दत्ता, अशोककुमार यात पाहुणा कलाकार होता.

□ अनिल कपूरचा पहिला चित्रपट कोणता? नायिका कोण? निर्माता कोण?

— १९८२चा *शक्ती* अनिल कपूरचा पहिला चित्रपट. या चित्रपटातील अमिताभच्या मुलाची त्याची भूमिका नायिका विरहित होता. मुशीर रियाज या चित्रपटाचे निर्माते होते.

नारायण फातर्पेकर, बांबोलीम, गोवा.

□ अजय देवगणच्या व्यक्तिरेखेवर आधारलेला चित्रपट कोणता?

— अजय देवगणने आजवर अनेक चित्रपटांत भूमिका केल्या असल्या तरी त्याच्या स्वतःच्या व्यक्तीरेखेवर आधारलेला असा एकही चित्रपट अद्याप निर्माण झालेला नाही.

□ क्रिकेट खेळाडू सुनील गावस्कर यांचा मराठी चित्रपट कोणता? कोणत्या साली प्रदर्शित झाला? नायिका कोण होती? 'क्रिकेट म्हणजे जीवन राजा...' हे गाणं कोणी गायलं होतं?

— १९७९चा *सावली प्रेमाची* सुनील गावस्करने भूमिका केलेला मराठी चित्रपट. अभिनेत्री मधुमती या चित्रपटाची निर्मात्री व नायिका होती. पण सुनील गावस्करची नायिका होती नवतारका श्वेता. 'क्रिकेट म्हणजे जीवन राजा...' हे गाणं सुनील गावस्करने गायलं होतं, पण ते या चित्रपटातलं नव्हतं. एका प्रायव्हेट अल्बममधील होतं.

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा-गोवा.

□ शंकर-जयकिशन यांनी विठ्ठलभाई पटेल यांच्याकडून प्रथम कोणत्या चित्रपटासाठी गाणं लिहून घेतलं?


— संगीतकार शंकर-जयकिशन यांनी गीतकार विठ्ठलभाई पटेल यांच्याकडून प्रथम *बॉबी* चित्रपटासाठी गाणं लिहून घेतलं.

□ शोभना समर्थना एकूण किती कन्या व पुत्र? समर्थ घराण्यातील किती मुली मुखर्जी परिवारात विवाहबद्ध झाल्या?

— नूतन, तनूजा व चतुरा या शोभनाबाईंच्या तीन कन्या व एक मुलगा जयदीप. तनूजा ही त्यांची एकच कन्या निर्माते शशधर मुखर्जी यांचे पुत्र सोमू मुखर्जी यांच्याशी विवाह करून मुखर्जी घराण्यात गेली.

संतोष हालकुडे, कुर्डुवाडी.

□ स्मिता पाटील व तनुजा यांनी कोणकोणत्या मराठी चित्रपटात कामं केली?



उंबरठा चित्रपटात गिरीश कर्नाड - स्मिता पाटील

— *राजा शिवछत्रपती, सामना, जैत रे जैत, सर्वसाक्षी, उंबरठा* हे स्मिताने प्रमुख भूमिका केलेले मराठी चित्रपट होते, तर *झाकोळ, गुलछडी, उनाड मैना* हे तनुजाने भूमिका केलेले प्रमुख मराठी चित्रपट.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ सईदा व अमिता नावाच्या अभिनेत्री होत्या का? त्यांनी भूमिका केलेले चित्रपट कोणते? नायक कोण?

— सईदा व अमिता नावाच्या अभिनेत्री होत्या. सईदा खानने निर्माते-दिग्दर्शक ब्रिज यांच्याशी विवाह केला होता. ब्रिजनी तिचा खून केला व नंतर तिच्या मुलीचाही खून करून स्वतः आत्महत्या केली. तिचा मुलगा कमल सदाना आज अभिनेता आहे.

हनीमून, कांच की गुडियां (मनोजकुमार), *फ्लॅट नं. ९* (अशोककुमार), *हम मतवाले नवजवान*(शेखर), *वॉन्टेड*(विजयकुमार), *मॉडर्न गर्ल*(प्रदीपकुमार), *अपना हाथ जगन्नाथ*(किशोरकुमार), *मैं शादी करने चला*(आय. एस. जोहर), *चार दरवेश* (संजीवकुमार), *बेखबर*(दारासिंग), *एक साल पहले*(सुजीतकुमार), *मैं हूं अल्लादिन* (अजीत), *सिंदबाद अलिबाबा अल्लादिन* (प्रदीपकुमार), *कन्यादान* (दिलीप राज), *यह जिंदगी कितनी हसीन है* हे सईदा खानने भूमिका केलेले चित्रपट. *ठोकर* (शम्मी कपूर), *श्री चैतन्य महाप्रभू*(भारत भूषण), *आबे हयात* (प्रेमनाथ), *मुनीमजी*(देव आनंद), *बादल और बिजली* (मनहर देसाई), *हम सब चोर है* (शम्मी कपूर), *अभिमान* (शेखर), *बडा भाई*(अनंत मराठे), *देख कबीरा रोया* (दलजीत), *तलाश*(अशोककुमार), *तुमसा नही देखा*(शम्मी कपूर), *हम भी कुछ कम नही*(रंजन), *राज सिंहासन*(महिपाल), *संस्कार* (अनंत मराठे), *आंगन*(रहमान), *मैंने जीना सिख लिया*(रविंद्र कपूर), *सावन*(भारत भूषण), *गुंज उठी शहनाई*(राजेंद्रकुमार), *छोटे नवाब*(मेहमूद), *मैं और मेरा भाई*(अजित), *प्यार की दास्तान* (सुदेशकुमार), *प्यासे पंछी* (मेहमूद), *माँ बेटा*(मनोजकुमार), *राखी* (अशोककुमार), *मम्मी डॅडी*(सुदेशकुमार, सॅम्सन, दारासिंग), *हम सब उस्ताद है* (किशोरकुमार), *सात समंदर पार, संगदिल* (दारासिंग), *अराऊंड द वर्ल्ड, मेरे मेहबूब* हे अमिताने भूमिका केलेले चित्रपट.